












सेवावर्धिनी

# सेवावार्ता

अंक ३

२०२५-२६

सेवावर्धिनी - एक विश्वासार्ह सहकारी

# अनुक्रमणिका


१. 'सेवा तरंग' : स्नेहपूर्ण संवाद

२. सामाजिक संस्था आणि त्यांचे कार्य -

२.१ सेवा सहयोग फाउंडेशन

२.२ मेक माय ड्रीम फाउंडेशन

३. प्रगतीचा नकाशा: स्वयंसेवी संस्थांसाठी (NGOs) - अर्थसंकल्प नियोजनाची मार्गदर्शिका

४. उपजीविकेचे साधन म्हणून मधमाशी पालन

५. सेवाव्रती -

५.१ क्रांती ते अन्नपूर्णा रणरागिणी प्रेमाताई

५.२ पुष्पाताई नडे: संघर्षातून फुललेले समाजसेवेचे 'स्व'-रूप

६. सेवा वार्ता -

व्हिडिओग्राफी: सेवाकार्याचा बोलका संवाद

# 'सेवा तरंग' : स्नेहपूर्ण संवाद

**नमस्कार मंडळी,**

बघता बघता वर्ष कसं सरलं समजलंच नाही. गेल्या वर्षभरात आपण '**सेवा वार्ता**' अंकांचे नियमित प्रकाशन केले आणि विविध विषयांवर प्रशिक्षणांचे आयोजनही केले. नुकतेच आभा संदीप शौचे यांनी 'व्हिडिओग्राफी'वर दिलेल्या अभ्यासपूर्ण ऑनलाईन प्रशिक्षणाला तुम्ही दिलेला प्रतिसाद खरंच कौतुकास्पद आहे. अनेक संस्थांनी त्याबद्दल आपले अभिप्राय सेवावर्धिनीला पाठवले आहेत, त्याबद्दल धन्यवाद.

आपले हक्काचे व्यासपीठ असलेले 'सेवा तरंग' संमेलन यावर्षी २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ रोजी पुणे येथे मोठ्या उत्साहात पार पडले.

या अंकात आपण 'फायनान्शिअल मॅनेजमेंट' (आर्थिक व्यवस्थापन) या महत्त्वाच्या विषयावर लेख प्रसिद्ध केला आहे. परंतु आपण फक्त लेख वाचून थांबायचे नाहीये, तर कृतीही करायची आहे. अशा  अनेक विषयांवरील सविस्तर प्रशिक्षण  'सेवा तरंग' या वार्षिक संमेलनात आपण घेतले आहे. त्याचा सविस्तर आढावा आपण पुढील अंकात निश्चितच घेणार आहोत.

गेल्या वर्षी आपण 'सेवा संस्था मानांकन' (Accreditation) या विषयाची पायाभरणी केली होती. तुम्हाला सांगायला आनंद होतोय की, नोंदणी केलेल्या २५ संस्थांची मानांकन प्रक्रिया आता यशस्वीपणे पूर्ण झाली आहे. या प्रक्रियेत सेवावर्धिनीला काय शिकायला मिळाले आणि सहभागी संस्थांचा अनुभव कसा होता, या संदर्भात संमेलनात प्रत्यक्ष विषय मांडणी करण्यात आली. इतकेच नाही, तर या संस्थांच्या पुढील प्रवासाची दिशा ठरवणे आणि नवीन संस्थांना या प्रक्रियेत सामील करून घेणे, हे महत्त्वाच्या टप्प्यांबाबत सविस्तरपणे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

तुमच्या सक्रिय सहभागामुळेच आपले हे संमेलन परंपरेनुसार याहीवर्षी  दिमाखात पार पडले. आपण अतिशय उत्साहात आणि उत्स्फुर्तपणे संमेलन यशस्वी केले.

**सोमदत्त पटवर्धन**
कार्यवाह, सेवावर्धिनी.



# २. सामाजिक संस्था आणि त्यांचे कार्य

## २.१ - सेवा सहयोग फाउंडेशन -

## निस्वार्थ सेवेतून माणुसकीचा झरा

**जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले...**

आपल्यापैकी प्रत्येकजण आयुष्याच्या शर्यतीत धावतोय - कोणी यशासाठी, कोणी सुखासाठी. पण कधीतरी शांत बसल्यावर मनाच्या कोपऱ्यात एक अस्वस्थ करणारा प्रश्न डोकं वर काढतोच की, "मी स्वतःसाठी तर रोजच जगतोय, पण समाजातील त्या शेवटच्या माणसासाठी मी काय केलं?" झोपडपट्ट्यांमधला तो अंधार, मजुरी करणाऱ्या बापाच्या पोराच्या डोळ्यातील विझलेली स्वप्नं आणि पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट करणारी ती माऊली... हे वास्तव चित्र पाहून संवेदनशील मनातून 'सेवा सहयोग फाउंडेशन' (SSF) चा जन्म झाला.

खऱ्या सेवेचा जन्म हा दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होण्याच्या तळमळीतून होतो. एका साध्या कौटुंबिक चर्चेतून एका पवित्र विचाराने मूळ धरले. आपल्या जवळ असलेले ज्ञान, कौशल्य आणि वेळ समाजातील वंचित बांधवांसाठी, विशेषतः झोपडपट्टीतील बांधवांसाठी वेचणे. स्वतःसाठी जगता जगता, ज्यांच्या नशिबी केवळ संघर्ष आला आहे, त्यांच्या आयुष्यात आनंदाचे दोन क्षण फुलविण्यासाठी सेवा सहयोग फाउंडेशन (SSF) उभे राहिले.

२००५ मध्ये एका साध्या विचाराने ही ज्योत पेटली - की आपल्या सुखी आयुष्यातील थोडासा 'वेळ' आणि थोडासा 'त्याग' जर दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश आणू शकत असेल, तर त्याहून मोठी सेवा कोणती ? आज हीच ज्योत हजारो स्वयंसेवकांच्या रूपाने एक मशाल बनली आहे.

एका साध्या कौटुंबिक गप्पांमधून जन्मलेला एक विचार आज हजारो जणांच्या जीवनात प्रकाशाचा किरण ठरला आहे. समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी, विशेषतः शहरी झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या बांधवांसाठी आपला वेळ, कौशल्य आणि संवेदनशीलता जाणवल्यामुळे 'सेवा सहयोग फाउंडेशन' (SSF) ची मुहूर्तमेढ रोवली गेली.

२००५ मध्ये सुरू झालेला हा प्रवास २००९ मध्ये एका 'सेक्शन ८' संस्थेच्या रूपात अधिकृत झाला. आज सेवा सहयोग सामाजिक जाणीव असलेले नागरिक, कॉर्पोरेट जगत आणि तळागाळातील स्वयंसेवी संस्था यांना जोडणारा एक भक्कम 'सेतू' बनले आहे.

### ध्येय आणि संकल्प: २०२४-२५ ची भरारी

Celebrating Humanity हे ब्रीदवाक्य घेऊन चालणाऱ्या या संस्थेची कार्यकक्षा थक्क करणारी आहे.

| उपक्रम | उपलब्धी |
|---|---|
| एकूण लाभार्थी | ४,६७,८३४ पेक्षा जास्त नागरिक |
| सक्रिय स्वयंसेवक | २९,०५४ झोकून दिलेले हात |
| भागीदार शाळा | १,८७१ (शहरी व ग्रामीण भाग) |
| कॉर्पोरेट (CSR) भागीदार | १६७ नामवंत कंपन्या |

**संस्थेचे २०२३ पर्यंतचे ध्येय:**

**३० लाख लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणणे. सेवा सहयोगचे कार्य प्रामुख्याने शिक्षण, सक्षमीकरण आणि पर्यावरण या तीन क्षेत्रांत विस्तारलेले आहे.**

### १. शिक्षण: उद्याच्या पिढीचे भविष्य

विद्यार्थ्यांची शालेय गळती थांबविणे आणि शिक्षणाचा दर्जा सुधारणे हे मुख्य उद्दिष्ट आहे.

- **समुत्कर्ष केंद्र:** झोपडपट्टीतील पाल्यांसाठी अभ्यासिका, मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्व विकास.
- **नॉलेज ऑन व्हील्स:** फिरत्या प्रयोगशाळा आणि ग्रंथालयांच्या माध्यमातून ग्रामीण भागात विज्ञानाचा प्रचार.
- **डिजिटल साक्षरता:** सरकारी शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा उभारून मुलांना तंत्रज्ञानाशी जोडणे.


### २. सक्षमीकरण: स्वावलंबी समाज

केवळ मदत न करता माणसाला स्वतःच्या पायावर उभे करणे, यावर संस्थेचा भर आहे.

- **कौशल्य विकास:** युवक आणि महिलांना रोजगारक्षम व्यावसायिक प्रशिक्षण.
- **आरोग्य आणि स्वच्छता:** किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीच्या आरोग्याबाबत जनजागृती.
- **ग्रामविकास:** शाश्वत जलसंधारण प्रकल्प आणि शेतकऱ्यांची क्षमता बांधणी.

### ३. पर्यावरण: निसर्गाचे ऋण

- **सौर किरण:** शाळांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करून पर्यायी ऊर्जेला प्रोत्साहन.
- **स्वच्छता अभियान:** वैयक्तिक आणि सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम व आरोग्यविषयक प्रबोधन.



### पारदर्शकता आणि विश्वासार्हता

सेवा सहयोगची शक्ती त्यांच्या 'हायब्रीड मॉडेल' मध्ये आहे. यामध्ये प्रशिक्षित कर्मचारी आणि हजारो स्वयंसेवक खांद्याला खांदा लावून काम करतात. प्रकल्पाचे नियोजन करताना लाभार्थींचा फीडबॅक आणि प्रत्यक्ष परिणाम (Impact Assessment) यांची काटेकोर नोंद घेतली जाते. आर्थिक पारदर्शकता ही संस्थेची सर्वात मोठी ओळख आहे.

### सन्मान आणि पुरस्कार

सेवा सहयोग फाउंडेशनच्या निस्पृह सेवेची दखल राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे:

- **२०२३:** पुणे मॅनेजमेंट असोसिएशनतर्फे 'सिग्निफिकंट सोशल इम्पॅक्ट अवॉर्ड'.
- **२०२५:** 'पद्मश्री डॉ. सु. वि. मापुस्कर निर्मल सेवा पुरस्कार' (देहू).

कोविड काळात केलेल्या अतुलनीय कामाबद्दल 'कोरोना वॉरियर' सन्मान.

### परिवर्तनाचा भाग व्हा!

जेव्हा करुणा (Compassion) आणि सहकार्य (Collaboration) एकत्र येतात, तेव्हाच खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांती घडते. सेवा सहयोग फाउंडेशन आपल्याला हीच संधी देत आहे. तुम्ही तुमचा वेळ देऊन किंवा आर्थिक योगदान देऊन या प्रवासात सहभागी होऊ शकता.

**एक उपक्रम, एक समाज आणि एक आयुष्य... आपण मिळून बदलू शकतो.**

**समाजाचं 'ऋण' फेडण्यासाठी आणि माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी उभी राहिलेली ही 'सेवेची वारी' आहे.**



## २.२. मेक माय ड्रीम फाउंडेशन -

## मानवी आत्मसन्मानाचा दैदीप्यमान विजयोत्सव

**झेप स्वावलंबनाकडून सन्मानाकडे**

**"मंजिलें उन्हीं को मिलती हैं, जिनके सपनों में जान होती है, पंखों से कुछ नहीं होता, हौसलों से उड़ान होती है!"**

एखाद्या लहान मुलाने स्वप्न पाहावं आणि निसर्गाने किंवा परिस्थितीने त्याच्या पंखांतील बळ हिरावून घ्यावं, यासारखं दुसरं दुःख नाही. पण जेव्हा समाज आणि एखादी संस्था या पाखरांच्या पंखात 'आत्मविश्वासाचे बळ' भरते, तेव्हा ते आकाशाला गवसणी घालण्याची ताकद निर्माण करतात. हीच जिद्द आणि उमेद जागवण्याचं काम गेल्या १५ वर्षांपासून **'मेक माय ड्रीम फाउंडेशन'** अत्यंत निष्ठेने करत आहे.

**"अपंगत्व हे शरीराला असते, मनाला नाही."** हे ब्रीदवाक्य केवळ कागदावर न ठेवता, गेल्या दीड दशकापासून शेकडो दिव्यांग मुलांच्या आयुष्यात प्रकाशाची नवी पहाट आणण्याचे कार्य 'मेक माय ड्रीम फाउंडेशन' (Make My Dream Foundation) अत्यंत निष्ठेने करत आहे. २००९ मध्ये स्थापन झालेली ही संस्था आज हजारो दिव्यांगांसाठी आशेचा किरण ठरली आहे.

मेधा कुलकर्णी यांनी या फाउंडेशनची मुहूर्तमेढ रोवली. स्वतः शारीरिक व्याधींचा सामना करत असताना, दिव्यांगांना सहानुभूती नको, तर समान संधी आणि सन्मान हवा आहे.हे त्यांनी अनुभवले. याच विचारातून 'मेक माय ड्रीम'चा जन्म झाला. शिक्षण, उपजीविका, आत्मसन्मान आणि सामाजिक समावेश या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी ही संस्था आज 'न मळलेल्या वाटेवरून' यशस्वीरीत्या चालत आहे.

बहुतेक संस्था केवळ आर्थिक मदत किंवा साधनं वाटप करण्यावर भर देतात. मात्र, 'मेक माय ड्रीम'चे कार्य त्यापलीकडे आहे. या संस्थेचा दृष्टिकोन 'होलिस्टिक' म्हणजेच सर्वांगीण विकासाचा आहे.

- **शिक्षण आणि सक्षमीकरण:** दिव्यांग मुलांच्या आवडीनुसार त्यांना नियमित शाळा-महाविद्यालयांत प्रवेश मिळवून दिला जातो. केवळ फी भरून संस्था थांबत नाही, तर वसतिगृह, वाहतूक आणि स्वयंसेवकांमार्फत शैक्षणिक मार्गदर्शनाची सुविधा दिली जाते.
- **आरोग्य आणि गतिशीलता:** दरवर्षी आरोग्य शिबिर घेतली जातात. क्लिष्ट शस्त्रक्रिया असोत की कॅलिपर, कुबड्या आणि कृत्रिम अवयवांचे वाटप; प्रत्येक गोष्ट अत्यंत संशोधनात्मक पद्धतीने आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने केली जाते. विशेष म्हणजे, स्वावलंबी झालेल्या तरुणांना त्यांची प्रगती थांबू नये यासाठी बिनव्याजी कर्ज देऊन स्वतःची दुचाकी (Modified Two-wheeler) घेण्यास मदत केली जाते.
- **मानसिक सक्षमीकरण:** दिव्यांग मुलांमधील न्यूनगंड दूर करण्यासाठी ट्रेकिंग मोहिम, योगासने, संगीत स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा आयोजित केल्या जातात. २०१५ चा 'वॉकेथॉन' असो किंवा २०२४ मधील राज्यस्तरीय पोहण्याची स्पर्धा, या उपक्रमांनी संधी मिळाल्यास हे 'विशेष' खेळाडू कोणत्याही क्षेत्रात मागे राहत नाहीत. हे सिध्द केले.

संस्थेची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे तिचे माजी लाभार्थी. जे तरुण आज स्वतःच्या पायावर उभे आहेत, त्यांनी एकत्र येऊन 'ड्रीम व्हिजन फंड' स्थापन केला आहे. त्यांच्यासारख्याच इतर गरजूंना ती मदत मिळावी यासाठी आपल्या कमाईतून काही हिस्सा ते दरमहा फाउंडेशनला देतात. मदतीचे हे चक्र फिरत राहणे, हेच या संस्थेच्या संस्कारांचे यश आहे.

आता 'मेक माय ड्रीम फाउंडेशन' आपल्या प्रवासातील सर्वात महत्त्वाचे पाऊल उचलत आहे - **'गुरुकुल: एक स्वतंत्र सुरुवात'.**





पुणे शहराच्या जवळ सव्वा एकर जागेवर सुमारे ३५ हजार स्क्वेअर फूट परिसरात अत्याधुनिक 'निवासी पुनर्वसन केंद्र' साकारत आहे. ते दिव्यांगांच्या स्वप्नांचे घर असणार आहे.

**१. अडथळामुक्त पायाभूत सुविधा:** संपूर्ण कॅम्पस दिव्यांगांच्या गरजा लक्षात घेऊन (Universal Access) डिझाइन केला आहे.
**२. शिक्षण आणि कौशल्य केंद्र:** येथे व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, संगणक लॅब, ब्रेल लायब्ररी आणि संगीत-कला स्टुडिओ असणार आहे.
**३. आरोग्य आणि थेरपी:** इन-हाउस फिजिओथेरपी, हायड्रोथेरपी (जलचिकित्सा), आणि कृत्रिम अवयव निर्मिती केंद्र (Prosthetic Unit) येथे असणार आहे.
**४. पर्यावरणपूरक व्यवस्थापन:** सौर ऊर्जा, रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि बायोगॅस प्रकल्पाद्वारे हा कॅम्पस पर्यावरणाचे रक्षण करत 'ग्रीन स्किल्स'चे शिक्षण देणार आहे.
**५. उत्पन्न निर्मिती:** जे दिव्यांग बांधव गंभीर स्वरूपाच्या अपंगत्वामुळे बाहेर नोकरी करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी कॅम्पसमध्येच रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जाणार आहेत.

आजवर या फाउंडेशनने ७६७ हून अधिक लाभार्थ्यांच्या जीवनात बदल घडवला आहे. यामध्ये अस्थिव्यंग, कर्णबधिर, दृष्टिहीन आणि सेरेब्रल पाल्सी असलेल्या मुलांचा समावेश आहे. जपानच्या ओकायामा गाकुगेईकान हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी दोनवेळा या प्रकल्पाला भेट देऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरही या कामाची दखल घेतली आहे.

संस्थेच्या या निस्पृह सेवेचा गौरव 'स्वयंसिध्दा पुरस्कार', 'अपंग सेवा सन्मान' आणि रोटरीसह अनेक नामांकित संस्थांनी वेळोवेळी केला आहे.

"इम्पॉसिबल" या शब्दातच "आय एम पॉसिबल" लपलेले आहे, हा विश्वास 'मेक माय ड्रीम फाउंडेशन' प्रत्येक दिव्यांगाच्या मनात रुजवत आहे. 'गुरुकुल'च्या माध्यमातून हे कार्य अधिक व्यापक होणार आहे. समाजाने केवळ मदतीचा हात म्हणून नाही, तर दिव्यांगांना त्यांच्या हक्काचा सन्मान मिळवून देण्यासाठी या चळवळीत सहभागी होणे काळाची गरज आहे.

"समाजाच्या दृष्टीने जे 'अपूर्ण' आहेत, त्यांना 'पूर्णत्वाकडे' नेणारा प्रवास म्हणजे मेक माय ड्रीम फाउंडेशन! आजवर आपण दिव्यांगांकडे फक्त मदतीच्या अपेक्षेने पाहणारे चेहरे म्हणून पाहिले असेल, पण या संस्थेने त्यांना 'कर्ते' बनवले आहे. उद्या जेव्हा 'गुरुकुल' उभे राहील, तेव्हा तिथून बाहेर पडणारा प्रत्येक तरुण हा समाजावर ओझे नसेल, तर समाजाचा आधार असेल. या मुलांच्या डोळ्यांतील ती जिद्द आणि समाधान हीच या संस्थेची खरी कमाई आहे. चला, या पवित्र यज्ञात आपणही समिधा होऊया आणि दाखवून देऊया की, माणुसकी अजून जिवंत आहे!"







# ३. प्रगतीचा नकाशा - स्वयंसेवी संस्थांसाठी (NGOs) अर्थसंकल्प नियोजनाची मार्गदर्शिका

अनेक स्वयंसेवी संस्थांसाठी वार्षिक अर्थसंकल्प (Budget) तयार करण्याची प्रक्रिया डिसेंबरमध्ये शांतपणे सुरू होते आणि जानेवारी-फेब्रुवारी येईपर्यंत तिला अचानक युध्द स्वरूप येते. कारण, हा अर्थसंकल्प अंतिम करून बोर्डासमोर सादर करावा लागतो आणि त्यानंतर धर्मादाय आयुक्तांसारख्या (Charity Commissioner) वैधानिक प्राधिकरणांकडे सुपूर्द करावा लागतो.

बऱ्याच सामाजिक संस्थांमध्ये अर्थसंकल्पाकडे केवळ एक 'आर्थिक' किंवा 'कायदेशीर पूर्तता' (Compliance) म्हणून पाहिले जाते. परंतु, जर हाच अर्थसंकल्प विचारपूर्वक तयार केला, तर तो संस्थेचे नियोजन आणि निर्णयक्षमतेसाठी सर्वांत प्रभावी साधन ठरू शकतो. हा लेख लिहिण्यामागचा मुख्य उद्देश हाच आहे की, स्वयंसेवी संस्थांनी अर्थसंकल्पाकडे केवळ आकडेमोड म्हणून न पाहता एक धोरणात्मक पाऊल म्हणून कसे पहावे, यात कोणाला सहभागी करून घ्यावे आणि जुन्या अनुभवातून शिकून भविष्यातील वाटचाल शाश्वत कशी करावी, याचे मार्गदर्शन करणे.

## १. अर्थसंकल्प म्हणजे 'नियोजन', केवळ 'अकाउंटिंग' नव्हे

अर्थसंकल्प तयार करणे ही केवळ वित्त (Finance) किंवा लेखा (Accounts) विभागाची जबाबदारी आहे, हा एक मोठा गैरसमज आहे. वित्त विभागाची भूमिका महत्त्वाची असली, तरी संस्थेचा अर्थसंकल्प हा प्रत्यक्षात संस्थेचे ध्येय, प्राधान्यक्रम आणि कार्यक्षमतेचे प्रतिबिंब असतो.

**एक अर्थपूर्ण अर्थसंकल्प खालील प्रश्नांची उत्तरे देतो:**

- आगामी वर्षात आपल्याला कोणत्या सामाजिक बदलाला प्राधान्य द्यायचे आहे?
- आपण कोणत्या समुदायावर, विषयावर किंवा भौगोलिक क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणार आहोत?
- हे प्रकल्प राबवण्यासाठी आपल्याकडे पुरेसे मनुष्यबळ आणि यंत्रणा सज्ज आहे का?

जर अर्थसंकल्पाचा कार्यक्रमाच्या नियोजनाशी संबंध नसेल, तर पुढे जाऊन निधीचा अभाव, कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण किंवा देणगीदारांच्या अपेक्षा पूर्ण न होणे यांसारख्या समस्या उद्भवतात. त्यामुळे अर्थसंकल्प ही कार्यक्रम (Program), वित्त, नेतृत्व आणि प्रशासन या सर्व टीम्सनी एकत्रितपणे करण्याची प्रक्रिया आहे.



## २. वास्तव ते आर्थिक नियोजन

बहुतेक सामाजिक संस्थांमध्ये अर्थसंकल्पाची खरी तयारी जानेवारीमध्ये सुरू होते. ही वेळ महत्त्वाची असते, कारण या काळात कार्यक्रमांची स्पष्टता, निधीची उपलब्धता आणि क्षेत्रीय स्तरावरील (Ground level) अनुभवांची सांगड घातली जाते.

**जानेवारीपर्यंत कार्यक्रम व्यवस्थापकांना (Program Managers) खालील गोष्टी स्पष्ट असतात:**

- **प्रकल्पांची स्थिती:** कोणते प्रकल्प मार्चमध्ये संपत आहेत आणि कोणते पुढील वर्षात सुरू राहणार आहेत?
- **निधीची उपलब्धता:** कोणत्या नवीन प्रकल्पांना देणगीदार किंवा CSR भागीदारांनी मंजुरी दिली आहे किंवा कोणाकडून मंजुरी अपेक्षित आहे?
- **अनुभव आणि शिक्षण:** कोणत्या उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला आणि कुठे बदलाची गरज आहे?

याच काळात CSR देणगीदार देखील त्यांच्या पुढील वर्षाच्या योजना आखत असतात. त्यामुळे ही वेळ समन्वय साधण्यासाठी सर्वोत्तम असते.

**कार्यक्रमांचे अर्थसंकल्पात रूपांतर करताना:**

- प्रत्येक विभाग प्रमुखाला त्यांच्या प्रकल्पाचे उपक्रमनिहाय (Activity-wise) बजेट तयार करण्यास सांगा.
- खर्चाचे वर्गीकरण सोप्या पद्धतीने करा: (उदा. कार्यक्रम खर्च, मानधन/पगार, प्रवास, देखरेख आणि अहवाल, तसेच प्रशासकीय खर्च).
- यावर अंतर्गत चर्चा करा, जेणेकरून खर्चाच्या आवश्यकतेबद्दल स्पष्टता येईल. या 'बॉटम-अप' (खालून वर) पध्दतीमुळे कामात पारदर्शकत आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होते.

## ३. संस्थात्मक अर्थसंकल्पाची बांधणी

कार्यक्रमांच्या नियोजनानंतर वरिष्ठ व्यवस्थापनाने या सर्व माहितीचे एकत्रीकरण करणे आवश्यक असते. अर्थसंकल्प सादर करताना तो **खालीलप्रमाणे विभागल्यास अधिक स्पष्टता येते:**

- **मंजूर प्रकल्प:** ज्यांचा निधी निश्चित आहे.
- **सुरू असलेले प्रकल्प:** ज्यांचा खर्च पुढील वर्षातही चालू राहणार आहे.
- **पाइपलाइन प्रकल्प:** ज्यांच्यावर चर्चा सुरू आहे किंवा प्रस्ताव सादर केले आहेत.
- **नवीन/धोरणात्मक प्रस्ताव:** जे संस्थेच्या व्हिजनचा भाग आहेत पण अजून निधी मिळालेला नाही.

या स्तरावर वरिष्ठ नेतृत्व गेल्या वर्षीच्या अनुभवावरून खर्चात सुधारणा करते आणि निधी उभारणीच्या कलानुसार त्यात बदल करते.



### ४. एकत्रीकरण, विश्वस्तांची मंजुरी आणि कायदेशीर पूर्तता

अंतर्गत अर्थसंकल्प तयार झाल्यावर तो संस्थेचे सचिव किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) तपासात आणि त्यानंतर बोर्ड/विश्वस्तांसमोर मंजुरीसाठी ठेवला जातो.

**विश्वस्त खालील बाबींवर विशेष लक्ष देतात:**

- आर्थिक प्रगती शाश्वत आहे का?
- निधी मिळण्याबाबत किती जोखीम आहे?
- नियोजित कामे संस्थेच्या मूळ उद्दिष्टांशी सुसंगत आहेत का?

मंजुरी मिळाल्यानंतर, हा अर्थसंकल्प धर्मादाय आयुक्तांच्या विहित नमुन्यात (Format) तयार करून २८/२९ फेब्रुवारीपूर्वी सादर करणे अनिवार्य असते.

**धर्मादाय आयुक्तांचा अर्थसंकल्प नमुना:** यात प्रामुख्याने आगामी वर्षातील अंदाजित जमा (देणगी, अनुदान, व्याज इ.) आणि अंदाजित खर्च (कार्यक्रम खर्च, आस्थापना खर्च, प्रशासकीय खर्च) यांचा समावेश असतो. हा नमुना पारदर्शकतेसाठी आणि कायदेशीर देखरेखीसाठी असतो, अंतर्गत नियोजनासाठी नाही. त्यामुळे केवळ हा फॉर्म भरण्यापुरते बजेट तयार केल्यास प्रत्यक्ष कामात अडचणी येऊ शकतात.

### ५. वास्तववादी अंतर्गत तयारीचे महत्त्व

केवळ 'आकडे भरून' कायदेशीर पूर्तता केल्यास प्रत्यक्ष कामात अनेक तफावती निर्माण होतात.

**वास्तववादी नियोजनामुळे:**

- संस्था नवीन आर्थिक वर्षात पूर्ण स्पष्टता आणि आत्मविश्वासाने प्रवेश करते.
- अंदाजित खर्च आणि प्रत्यक्ष खर्च यात मोठी तफावत राहत नाही.
- धर्मादाय आयुक्तांकडून येणाऱ्या नोटिस, दंड किंवा चौकशी टाळता येते.

देणगीदारांशी संवाद साधताना संस्था अधिक सक्षमपणे आपली बाजू मांडू शकते.

थोडक्यात सांगायचे तर, वेळेत आणि विचारपूर्वक केलेली अर्थसंकल्पाची मांडणी संस्थेला केवळ 'फाईल्स' सांभाळण्यापासून वाचवत नाही, तर प्रत्यक्ष सामाजिक प्रभाव (Impact) निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते.


**सीए. सोमदत्त लाड**

**सोशल इम्पॅक्ट असेसॅार | CFA(ESG)**

**सह-संस्थापक, ट्रान्सयुनिफाय सोल्यूशन्स प्रा. लि.**

**९८५०८४४५००**

**www.transunifyy.com**

# ४. उपजीविकेचे साधन म्हणून मधमाशी पालन

मधमाशी पालन, ज्याला अपिकल्चर (Apiculture) असेही म्हणतात, हे मध, मेण आणि इतर उपयुक्त उत्पादने मिळवण्यासाठी मधमाशांचे संगोपन करण्याचे काम आहे. भारतात ग्रामीण व आदिवासी समाज पारंपरिक पध्दतीने जंगलातून मध गोळा करत असत. परंतु आता शास्त्रोक्त मधमाशी पालनाच्या पध्दतीमुळे हे एक शाश्वत आणि नियोजित उपजीविकेचे साधन बनले आहे. यासाठी मोठ्या जमिनीची गरज नाही आणि गुंतवणूकही फार कमी आहे. त्यामुळे लहान शेतकरी, आदिवासी कुटुंब आणि महिलांच्या गटांसाठी हे एक पूरक उत्पन्नाचे साधन ठरू शकते.



### मधमाशी पालनाचे महत्त्व

मधमाशी पालन केवळ मधासाठीच महत्त्वाचे नाही, तर शेतीसाठीही फार उपयुक्त आहे. मधमाश्यांमुळे पिकांचे परागसिंचन अधिक चांगले होते. फळे, भाजीपाला, तेलबिया अशा पिकांमध्ये उत्पादन २०-३०% पर्यंत वाढते. याचा अर्थ असा की मधमाशी पालन शेतकऱ्यांना दोन प्रकारे मदत करते - मध व इतर उत्पादनांमधून थेट उत्पन्न मिळते आणि शेतीमधून अप्रत्यक्षरीत्या अधिक उत्पादन मिळते.

### संधी व फायदे

ग्रामीण भागात मधमाशी पालन अनेक संधी उपलब्ध करून देते. मधाला देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी आहे. मेणाचा उपयोग मेणबत्त्या, सौंदर्यप्रसाधने व औषधांमध्ये होतो. शेतकरी परागसिंचन सेवेसाठी आपल्या पेट्या भाड्याने देऊनही उत्पन्न मिळवू शकतात. महिला व युवक हे घरगुती पातळीवर सहजतेने हे कार्य करू शकतात, तर स्वयं-सहायता गट (SHG) व शेतकरी उत्पादक संघटना (FPO) यामधून सामूहिकरित्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन करता येते.

मधमाशी पालनाचे काही फायदे असे आहेत: कमी भांडवलात जास्त परतावा मिळतो, जमिन नसलेल्या कुटुंबांसाठीही उपयुक्त आहे, घरच्या घरी पौष्टिक अन्न (मध) उपलब्ध होते, गावामध्ये रोजगार निर्माण झाल्याने स्थलांतर कमी होते, महिलांचे सशक्तीकरण होते तसेच पर्यावरण व जैवविविधता जपली जाते.

### मधमाशी पालन कसे सुरू करावे

मधमाशी पालन योग्य टप्प्याटप्प्याने केल्यास अगदी सोपे आहे. सर्वप्रथम प्रशिक्षण घेणे महत्त्वाचे आहे. यामध्ये मधमाशी व्यवस्थापन, पेट्यांचे संगोपन व मध काढण्याच्या पद्धती शिकवल्या जातात. CBRTI पुणे, KVIC, कृषी विद्यापीठे व विविध स्वयंसेवी संस्था अशा प्रशिक्षण सुविधा पुरवतात. यासाठी लागणारे साहित्य म्हणजे मधमाशी पेट्या, मधमाशी कुटुंब, संरक्षक पोशाख, स्मोकर, चाकू व मध काढण्याचे यंत्र. पेट्या सावलीत व फुलझाडांच्या जवळ ठेवाव्या लागतात आणि नियमित काळजी घेणे आवश्यक असते. सुरुवातीस ५-१० पेट्यांपासून सुरुवात करून हळूहळू ५० ते १०० पेट्यांपर्यंत वाढ करता येते.

## शासन व संस्थात्मक मदत

भारत सरकार व राज्य सरकार या क्षेत्रात मोठे पाठबळ देतात. KVIC (खादी व ग्रामोद्योग आयोग) प्रशिक्षण व पेट्या उपलब्ध करून देते. CBRTI (सेंट्रल बी रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट), पुणे प्रगत प्रशिक्षण व संशोधनाची सुविधा देते. राष्ट्रीय मधमाशी व मध मिशन (NBHM) अंतर्गत अनुदान व मदत दिली जाते. नाबार्ड कडून पतपुरवठा व कर्जाची सुविधा मिळते. तसेच राज्य कृषी विभागाकडूनही पेट्या व प्रशिक्षण पुरवले जाते.

## सेवावर्धिनीची भूमिका

गेल्या २७ वर्षांपासून सेवावर्धिनी ग्रामीण व आदिवासी भागात शाश्वत उपजीविका, महिला सशक्तीकरण व कौशल्यविकासासाठी काम करत आहे. मधमाशी पालनासारख्या उपक्रमांतून संस्था शेतकऱ्यांना प्रशिक्षण, साहित्य व बाजारपेठेची जोडणी उपलब्ध करून देते. या माध्यमातून स्थलांतर कमी होऊन ग्रामीण कुटुंबांचा आर्थिक विकास साध्य करण्याचे सेवावर्धिनीचे उद्दिष्ट आहे.

## पुढील वाटचाल

मधमाशी पालन ग्रामीण उपजीविका बदलण्याची क्षमता ठेवते. ५०-१०० पेट्यांचे संगोपन करणारे कुटुंब दरवर्षी रुपये ५० हजार ते एक लाख इतके अतिरिक्त उत्पन्न मिळवू शकते. यातून उत्पन्नासोबतच शेतीतील उत्पादनवाढ, महिलांचे सशक्तीकरण व पर्यावरण संवर्धनही साध्य होते. योग्य प्रशिक्षण, साहित्य व बाजारपेठेच्या जोडण्या उपलब्ध झाल्यास मधमाशी पालन हे शाश्वत ग्रामीण विकासाचे प्रमुख साधन ठरू शकते.



दिपक आव्हाड - प्रकल्प व्यवस्थापक

# ५. सेवाव्रती -

## ५.१ - क्रांती ते अन्नपूर्णा रणरागिणी प्रेमाताई



एखाद्या हिंदी चित्रपटातील पटकथाही फिकी वाटावी, अशा थरारक आणि **प्रेमाताई पुरव** यांची संघर्षयुक्त जीवनाची चित्तरकथा.

**प्रेमाताई पुरव (पूर्वाश्रमीच्या प्रेमा तेंडुलकर)**. गोव्यातील एका सधन आणि सुधारक घरात जन्मलेल्या प्रेमाताईंचे बालपण सुखात जाण्याऐवजी क्रांतीच्या धगधगत्या ज्वालांमध्ये गेले. आज 'अन्नपूर्णा' संस्थेच्या माध्यमातून हजारो महिलांच्या जीवनात प्रकाश निर्माण करणाऱ्या या माऊलीचा प्रवास थक्क करणारा आहे.

### क्रांतीचे बाळकडू आणि खडतर बालपण

तेंडुलकरांचे घर म्हणजे गोवा मुक्ति संग्रामातील गुप्त क्रांतिकारकांचे आश्रयस्थान. पोर्तुगीजांच्या अमलाखालून गोव्याची सुटका करण्यासाठी अनेक खलबते याच घरात चालत. प्रेमाताईंचा स्वभाव मुळातच निडर आणि प्रसंगावधानी होता, त्यामुळे वयाच्या अवघ्या सातव्या वर्षापासूनच त्या अशा क्रांतिकारी कामांमध्ये पुढे असत. १९४८ मध्ये गावात मोठी धरपकड झाली. स्वतःच्या वृध्द आई-वडिलांना त्रास होऊ नये आणि तोतया क्रांतिकारकांपासून बचाव व्हावा, यासाठी वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी घर सोडले. रेल्वे स्टेशन मास्तर बापट यांच्या आश्रयाने त्यांचे शिक्षण सुरू झाले, पण क्रांतीचे रक्त स्वस्थ बसू देत नव्हते.

### गोळीबार आणि साम्यवादाशी जुळलेले नाते

१९५२ मध्ये पणजीवर पोर्तुगीज सैनिकांनी हल्ला केला. गोवा मुक्ति सैनिकांना रसद पुरवताना प्रेमाताईंना गोळी लागली. या गंभीर जखमी अवस्थेत कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी त्यांची शुश्रूषा केली आणि येथूनच त्यांचे साम्यवादी विचारांशी कायमचे नाते जुळले. पुढे मुंबईत आल्यावर छत नसतानाही त्यांनी संयुक्त महाराष्ट्र लढा आणि पक्षाचे काम जोमाने सुरू ठेवले. याच प्रवासात त्यांना **नरेंद्र ऊर्फ दादा पुरव** हे जीवनसाथी लाभले.

### 'अन्नपूर्णा'चा उदय

गोवा मुक्ति आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र लढा, या कार्यक्षेत्रांच्या बरोबरीने स्त्री सक्षमीकरणाचे मोठे दालन त्यांनी उघडले. 'अन्नपूर्णा'हा नवा अध्याय सुरू केला.दादा पुरवांमुळे प्रेमा ताईंना गिरणी कामगारांचे जीवन जवळून अभ्यासायला मिळाले. दादांच्या प्रेरणेने त्यांनी गिरणी कामगार स्त्रियांचे आर्थिक प्रश्न सोडवण्याच्या उद्देशाने पावले उचलली. गिरणी कामगारांसाठी खानावळी चालवून अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांचे होत असलेले शोषण थांबवण्यासाठी प्रेमा ताईंनी त्या सर्व स्त्रियांना संघटित केले.

या स्त्रियांना बँकेकडून अर्थसाह्य मिळाले व या सर्व भगिनींचे 'अन्नपूर्णा' असे नामकरण झाले.

पुढे जाऊन स्त्रियांच्या वेगवेगळ्या समस्येतून मार्ग काढत असताना नवनवीन उपक्रम हाती घेण्यास प्रेमाताईंनी प्रारभं केलात्यातून **'अन्नपूर्णा'** चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. १९७५ मध्ये अधिकृतरीत्या 'अन्नपूर्णा महिला मंडळा'ची स्थापना झाली. कॉ. डांगे यांनी लिहून दिलेली घटना आणि १५ योजना प्रेमाताईंनी प्रत्यक्षात उतरवल्या.

## संकटांवर मात आणि कार्याचा विस्तार

१९८१ च्या गिरणी संपाने स्त्रियांची भाकरी हिरावली.तेव्हा प्रेमाताईंनी स्वतःच्या घरातून डबे देण्याचा व्यवसाय सुरू केला.हा व्यवसाय वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने आर्थिक संस्थांच्या मदतीने दादरला तीन हजार चौरस फूट एवढी मोठी .'श्रध्दा' नावाची वास्तू उभारली.वाशी येथील 'अन्नपूर्णानगर' आणि श्रध्दा ही त्यांच्या कष्टाची फळे आहेत. सामूहिक स्वयंपाकघरातून दररोज ७ ते ८ हजार डबे कॉर्पोरेट कंपन्यांना पुरवले जाऊ लागले. १९८६ मध्ये अन्नपूर्णा महिला मंडळ पतपेढीची स्थापना करण्यात आली. त्याच्या जोडीला एल.आय.सी. च्या 'जनश्री विमा योजने' चा लाभ अन्नपूर्णा सदस्यांना मिळवून दिला गेला.

समाजातील शोषित आणि पीडित मुलींनाही त्यांनी सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवला. अन्नपूर्णाच्या मदतीने त्या आज मानाचे जीवन जगत आहेत.

## काळाप्रमाणे बदलणारी पावले

बदलत्या काळानुसार प्रेमाताई आणि त्यांच्या कन्या **डॉ. मेधा सामंत** यांनी संस्थेचे स्वरूप बदलले. अन्नपूर्णा संस्था केवळ खाद्यसेवेपुरती मर्यादित न राहता तिने कर्जपुरवठा, सूक्ष्म विमा, पाळणाघरे आणि शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी मजल मारली.

- **अर्थ उद्यम पूर्णा:** पुणे येथील पतपुरवठा संस्था.
- **स्वास्थ्य पूर्णा:** आरोग्य सुरक्षा.
- **वात्सल्य पूर्णा:** पाळणाघरे.
- **विद्या पूर्णा:** शैक्षणिक मदत.

ज्यांच्या अंगावर पोर्तुगीजांच्या गोळ्यांचे वळ उमटले, त्याच हातांनी हजारो स्त्रियांच्या आयुष्यात आर्थिक क्रांती घडवली. संस्थेच्या कामाच्या उद्दिष्टांचा विसर पडू न देता सजगपणे संस्थेच्या कार्यपद्धतीमध्ये आवश्यक तेथे त्यांनी वेळोवेळी सुधारणा केल्या. आपल्या भूमिकेत साचलेपणा येऊ न देता अन्नपूर्णा महिला मंडळाची वाटचाल प्रेमाताईंनी अविरतपणे चालू ठेवली.

सत्तेचा किंवा कर्तृत्वाचा कोणताही अहंकार न बाळगता, प्रेमाताई आजही अविरतपणे काम करत आहेत. सेवाभावाचा हा वटवृक्ष पिढ्यानपिढ्या स्त्रियांना आधार देत राहील.

**अशा या रणरागिणीला आणि सेवाव्रतीला त्रिवार वंदन.**

"(वरील तपशील बाया कर्वे स्त्री अभ्यास केंद्र, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था पुणे यांच्या 'कर्त्या करवित्या' या पुस्तकातून घेतला आहे)."

# ५.२ - पुष्पाताई नडे - संघर्षातून फुललेले समाजसेवेचे 'स्व'-रूप



**"सेवा परमो धर्मः"** या ब्रीदवाक्याला आपल्या श्वासात आणि कृतीत भिनवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे **पुष्पाताई नडे**. पुण्यातील 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या सहकार्यवाह म्हणून कार्यरत असणाऱ्या पुष्पाताईंनी स्वतःच्या आयुष्यातील दु:खाचे भांडवल केले नाही.त्या अनुभवाचा उपयोग समाजाच्या सुखासाठी कसा करता येईल, याचा एक वस्तुपाठच घालून दिला आहे.

पुष्पाताई नडे यांचा जीवनप्रवास प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हजारो व्यक्तींचे आयुष्य प्रकाशमान करणारा आहे. 'दीपस्तंभाप्रमाणे प्रेरणादायी इतिहास आहे.

## संघर्षातून जिद्दीचा जन्म

पुष्पाताईंचा जन्म पुण्यात झाला. वडील मारुतराव नडे पी.एम.टी. मध्ये कार्यरत होते, तर आई गृहिणी. वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी १९६९ मध्ये त्यांचा विवाह झाला. संसाराची स्वप्ने पाहण्याच्या वयात त्यांच्या वाट्याला सासरी प्रचंड हालअपेष्टा आणि त्रास आला. मात्र, कठीण परिस्थितीतही त्यांनी आपली जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास सोडला नाही. "मॅट्रिक व्हायचेच" या निर्धाराने त्यांनी अभ्यास सुरू ठेवला आणि १९७६ मध्ये त्या मॅट्रिक झाल्या. अखेर, सासरचा छळ असह्य झाल्यावर त्यांनी आपल्या वडिलांचे घर गाठले, ते पुन्हा मागे न फिरण्यासाठीच. हा त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट ठरला.

## मातृत्वाचा विस्तार: बालग्राम ते स्व-रूपवर्धिनी

सरकारी नोकरीची संधी चालून आली असतानाही, पुष्पाताईंचे मन लिपिक पदाच्या चौकटीत रमले नाही. समाजासाठी काहीतरी ठोस करण्याची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. आई-वडिलांचा विरोध पत्करून त्यांनी १९८२ मध्ये येरवडा येथील 'बालग्राम' मध्ये सेवा सुरू केली. तिथे त्या निराधार मुलांच्या 'आई' बनल्या. मुलांचा सर्वांगीण विकास हेच त्यांचे ध्येय बनले.

पुढे १९८७ मध्ये त्यांनी स्वतःची गुणवत्ता वाढविण्यासाठी बालवाडी, उद्यानशास्त्र आणि शिवणकाम यांसारखे कोर्सेस पूर्ण केले. गुरुतुल्य नाना जोशी आणि त्यांच्या पत्नीच्या पाठिंब्याने त्या 'स्व-रूपवर्धिनी' या संस्थेशी जोडल्या गेल्या. स्वरूप वर्धीनीचे संस्थापक किशाभाऊ पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सायंकालीन शाखा सुरू केली, तिथे मुलांच्या शिक्षणासोबतच संस्कारांची पेरणी झाली.

## 'पाकोळी'ची झेप आणि शारदामणी विभाग

१९८८ मध्ये त्यांनी 'स्व-रूपवर्धिनी'त बालवाडी सुरू केली. सुरुवातीला मोठा विरोध झाला, पण पुष्पाताई डगमगल्या नाहीत. १५ जुलैला त्यांनी बालवाडी सुरू केली, जिचे नाव **"पाकोळी"** ठेवण्यात आले. ज्याप्रमाणे एक छोटी पाकोळी पंखात बळ आल्यावर आकाशात उंच झेप घेते, तशीच झेप आज या बालवाडीतून शिकलेली ४ हजार ८०० हून अधिक विद्यार्थी घेत आहेत.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी 'शारदामणी विभागा'ची धुरा सांभाळली. मुळशी तालुक्यातील दुर्गम भागातील महिलांशी संपर्क साधून त्यांना 'प्रेरणा शिबिरा'च्या माध्यमातून संघटित केले. 'सहाय्यक परिचारिका' (Nursing Assistant) हा त्यांनी सुरू केलेला कोर्स आज अनेक मुलींना रोजगार मिळवून देत आहे. विशेष म्हणजे, या संस्थेत आजही कोणतेही शुल्क न घेता केवळ देणग्यांवर हे कार्य अविरत सुरू आहे.

### बहुआयामी उपक्रम आणि सेवाव्रत

पुष्पाताईंच्या देखरेखीखाली शिक्षणासोबतच समाजाच्या आवश्यकतेनुसार  अनेक प्रकल्प उभे राहिलेत्यात प्रामुख्याने

- **आजोळ:** नोकरी करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी एक सुरक्षित घर.
- **आर्थिक नियोजन:** केटरिंग, चॉकलेट मेकिंग, फॅब्रिक पेंटिंग आणि जुन्या साड्यांपासून पिशव्या बनवण्याचे प्रशिक्षण देऊन महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले.
- **प्रौढ साक्षरता:** शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांसाठी साक्षरतेचे वर्ग.

पुष्पाताई नडे यांचे जीवन म्हणजे धैर्याची आणि करुणेची एक अप्रतिम सांगड आहे. स्वतःच्या आयुष्यात आलेल्या वादळांनी त्या कोलमडून पडल्या नाहीत, तर त्यांनी त्या वादळाची दिशा बदलून समाजाच्या कल्याणाकडे वळवली.  आज ७० व्या वर्षीही त्यांचा उत्साह एखाद्या तरुणाला लाजवेल असा आहे. मनाच्या गाभाऱ्यात समाजसेवेची ज्योत प्रज्वलित ठेवून त्या खऱ्या अर्थाने अनेकांचा आधारस्तंभ बनल्या आहेत.

परिस्थिती कितीही कठीण असली तरी  मनात जिद्द आणि कामात प्रामाणिकपणा असेल, तर आपण स्वतःसोबतच हजारो जणांचे आयुष्य उजळू शकतो.

**ताईंच्या कार्याला आणि धैर्याला वंदन.**

"(वरील तपशील बाया कर्वे स्त्री अभ्यास केंद्र, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था पुणे यांच्या 'कर्त्या करवित्या' या पुस्तकातून घेतला आहे)."

# ६. सेवा वार्ता - व्हिडिओग्राफी - सेवाकार्याचा बोलका संवाद

**"बोलणाऱ्याची अंबाडी विकली जाते, पण न बोलणाऱ्याचे गहूही विकले जात नाहीत!"** ही म्हण आजच्या डिजिटल युगात तंतोतंत लागू पडते.

आपल्या विविध सेवासंस्थांचे कार्य मौल्यवान आणि दर्जेदार आहे. आपण जमिनीवर उतरून कष्ट उपसतो, समाजाचे आयुष्य बदलतो; पण अनेकदा हे काम जगासमोर मांडायला आपण कमी पडतो. आजच्या काळात केवळ 'काम' करणे पुरेसे नाही, तर ते प्रभावीपणे 'दिसणे' आणि 'सांगता येणे' तितकेच महत्त्वाचे झाले आहे.

आजच्या डिजिटल युगात प्रचार आणि प्रसाराचे प्रभावी माध्यम व्हिडीओ आहे. ऑडिओ आणि व्हिडिओद्वारे सोशल मिडिया व्यापलेला आहे. अनेक शब्दांचे काम एक व्हिडीओ करत असतो. आवाज आणि दृष्य थेट दर्शकाच्या मनाला भिडतात. साक्षर-निरक्षर, भाषिक अडचण असेल तरीही व्हिडीओ सगळ्यांपर्यंत संदेश सहज पोहोचवू शकतो.फेसबुक, व्हॉट्सअॅप आणि इंस्टाग्रामवर व्हिडीओ फॉरमॅटला सर्वाधिक पसंती मिळते, ज्यामुळे प्रचार-प्रसार वेगाने होतो. कमी वेळात जास्तीत जास्त माहिती आणि कामाचा आवाका मांडण्यासाठी व्हिडीओ हे सर्वोत्तम माध्यम आहे.

आजच्या काळात कोणत्याही स्वयंसेवी संस्थेचे (NGO) कार्य केवळ जमिनीवर असून चालत नाही, तर ते जगासमोर प्रभावीपणे मांडणेही तितकेच गरजेचे आहे. व्हिडिओग्राफी आणि एडिटिंग हे देणगीदार आणि समाजाला आपल्या कार्याशी जोडण्याचे एक शक्तिशाली माध्यम आहे. योग्य व्हिडिओच्या माध्यमातून आपण आपल्या कामाची मांडणी अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो. नुकतेच आभा संदीप शौचे यांनी 'व्हिडिओग्राफी' वर जे अभ्यासपूर्ण ऑनलाईन प्रशिक्षण दिले त्या आधारे माहितीपूर्ण लेख.

### चित्रीकरणापूर्वीची तयारी (Pre-filming)

व्हिडिओ बनवण्यापूर्वी केवळ कॅमेरा हातात न घेता त्यामागील उद्देश स्पष्ट असणे आवश्यक आहे.

**प्रेक्षकांचे वर्गीकरण:** तुमचा व्हिडिओ नक्की कोण पाहणार आहे? कंपन्यांचे CSR विभाग, देणगीदार, सरकारी अधिकारी की सामान्य जनता? हे आधी ठरवा.

**कथालेखन (Storytelling):** प्रत्येक नॉन-प्रॉफिट संस्थेकडे सांगण्यासारखी एक हृदयस्पर्शी कथा असते. तुमच्या व्हिडिओमधून केवळ माहिती न देता, एक 'गोष्ट' सांगितली गेली पाहिजे.

कोणताही व्हिडिओ बनविण्यापूर्वी त्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. व्हिडिओ कोणासाठी बनवत आहोत (प्रेक्षक), हे आधी निश्चित करा. तुमचे प्रेक्षक देणगीदार कंपन्या, सरकारी विभाग किंवा सोशल मीडिया वापरकर्ते असू शकतात. व्हिडिओच्या माध्यमातून नेमका काय संदेश द्यायचा आहे आणि कोणती गोष्ट सांगायची आहे, हे आधीच ठरवा. व्हिडिओचा नेमका संदेश काय असावा, हे आधीच लिहून काढा.

### तांत्रिक चित्रीकरण कौशल्ये (Filming Techniques)

चांगला व्हिडिओ हा तांत्रिकदृष्ट्या अचूक असणे गरजेचे असते.

**अँगल आणि ओरिएंटेशन:**

जर तुम्ही Instagram/Facebook Reels किंवा YouTube Shorts साठी कंटेंट बनवत असाल, तर फोन नेहमी उभा (Vertical) धरावा. जर तुम्ही डॉक्युमेंटरी, बातम्या किंवा YouTube वरील सविस्तर व्हिडिओ बनवत असाल, तर फोन आडवा (Horizontal) धरावा.

**स्थिरता (Stability) :** व्हिडिओ हालता कामा नये. चित्रीकरण करताना फोन जमेल तितका स्थिर धरा. जास्त हालचाल केल्यास व्हिडिओची क्वालिटी खराब होते. शक्य असल्यास ट्रायपॉड किंवा सेल्फी स्टिकचा वापर करा.

### फ्रेमिंग आणि फोकस

कॅमेरा सेटिंगमध्ये 'Grid Lines' सुरू करा.

ज्या व्यक्तीची मुलाखत किंवा वस्तूचे चित्रीकरण करायचे आहे, तिला मध्यभागी असलेल्या चौकटीत ठेवा. वस्तू हलत असल्यास तिला उजव्या किंवा डाव्या चौकटीत ठेवून कॅमेरा त्याप्रमाणे फिरवा.

चित्रीकरण करताना 'Headroom' (डोक्यावरील जागा) आणि 'Noseroom' कडे विशेष लक्ष द्या.

### प्रकाशयोजना आणि सेटिंग्ज (Lighting & Settings)

**फोकस:** व्हिडिओ सुरू करण्यापूर्वी स्क्रीनच्या मध्यभागी क्लिक करून फोकस लॉक करा, ज्यामुळे फ्रेम स्पष्ट राहते.

**प्रकाश:** कमी उजेडात व्हिडिओ काढताना आधी फोकस करा आणि मग गरज पडल्यास उजेड ॲडजस्ट करा.

**टॉर्चचा वापर:** अंधारात व्हिडिओ काढताना ज्या फोनने शूट करत आहात त्याचा फ्लॅश वापरू नका; त्याऐवजी दुसऱ्या फोनचा टॉर्च वापरावा.

### एडिटिंग(Video Editing)

व्हिडिओ शूट केल्यानंतर त्याला व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी योग्य सॉफ्टवेअरची निवड महत्त्वाची आहे.

**Canva** - हे वापरण्यास अत्यंत सोपे आहे. यामध्ये व्हिज्युअल इफेक्ट्स चांगले देता येतात, परंतु प्रोफेशनल कामासाठी बारकाव्यांवर लक्ष देता येत नाही. याचे फ्री फीचर्स मर्यादित असू शकतात.

**DaVinci Resolve -** हे पूर्णपणे विनामूल्य (Free) सॉफ्टवेअर आहे. यामध्ये बारकाव्यांकडे लक्ष देणे आणि सबटायटल्स देणे सोपे आहे. हे अधिक व्यावसायिक (Professional) दिसते, मात्र सुरुवातीला शिकण्यासाठी थोडे कठीण वाटू शकते.

### सराव आणि उपक्रम

तुमच्या संस्थेच्या कार्याचा व्हिडिओ बनवण्यासाठी खालील पावले उचला:

संस्थेचा कोणताही एक सुरू असलेला उपक्रम निवडा. त्या उपक्रमाचे प्रेक्षक आणि त्याची गोष्ट (Script) आधी लिहून काढा. त्या उपक्रमावर आधारित एक व्हिडिओ किंवा रील (Reel) तयार करा. शक्य असल्यास *DaVinci Resolve वर एडिटिंगचा सराव करा.

कमी वेळात जास्तीत जास्त माहिती आणि कामाचा आवाका मांडण्यासाठी व्हिडिओ हे सर्वोत्तम माध्यम आहे. पॉडकास्ट किंवा ऑडिओ क्लिप्सच्या माध्यमातून लोक प्रवासात किंवा काम करतानाही तुमच्या कामाची माहिती ऐकू शकतात. ऑडिओ-व्हिडिओच्या स्वरूपात जतन केलेले काम हे भविष्यातील पिढीसाठी एक प्रेरणादायी ऐतिहासिक दस्तऐवज ठरते.

तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेले दर्जेदार व्हिडिओ संस्थेची एक व्यावसायिक आणि आधुनिक ओळख निर्माण करतात. आपल्या सेवायज्ञाचे दर्शन देणारा व्हिडिओ, देणगीदारांसाठी कृतज्ञता आणि नव्या पिढीसाठी प्रेरणा आहे.

जेव्हा आपण आपल्या सेवाकार्याचा एक छोटासा व्हिडिओ तयार करतो, तेव्हा तो तर देणगीदारांना आपल्या कष्टांचे आणि परिणामांचे थेट दर्शन घडवतो. त्यांना कामाचे समाधान देतो आणि नवीन सहकाऱ्यांना या कार्याशी जोडले जाण्यासाठी प्रेरित करतो. म्हणूनच, व्हिडिओग्राफी आपल्या कार्याचा प्रभाव वाढवणारे एक सक्षम माध्यम आपण सगळेच यातून प्रेरणा घेऊया.



**श्रीमती. अंजली तागडे - कार्यकर्ता**

# सेवावार्ता

## संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन - कार्यवाह
श्री. विक्रम पंडित – कार्यकारिणी सदस्य
श्री. गिरीश देगावकर - मुख्य कार्यकारी अधिकारी
सौ. गिरीजा सिरशीकर - महाव्यवस्थापक
श्रीमती. अंजली तागडे - कार्यकर्ता

सेवावर्धिनी

सेवावर्धिनी - एक विश्वासार्ह सहकारी